# १४२ - कल्याण (पूर्व) विधानसभा मतदार संघ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, "ड" प्रभागक्षेत्र काटेमानिवली, कल्याण (पूर्व)

दुरध्वनी क्र.- 0251-2360005 ई मेल :- 142kalyaneast@gmail.com


क्र./निवडणूक/ वगळणी / कावि /६७ /२०२१ दिनांक : - १९/०६/२०२१

## जाहीर नोटीस

ठाणे जिल्हयातील १४२ - कल्याण (पुर्व) विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्या मार्फत दिनांक – ०१/०१/२०२१ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादयांच्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत यादीमध्ये छायाचित्र नसलेल्या (RESIDUAL VOTERS) यांचे फोटो जमा करणे, तसेच मयत मतदारांचे नमूना – ७ चा अर्ज घेणे व स्थलांतरीत मतदारांचे पंचनामे करणे बाबत काम सुरु होते. त्यानुसार ९२१९२ मतदारांची नावे स्थलांतरीत असल्याचे दिसून आलेले आहे. सदरचे मतदार ज्या ठिकाणी नोंदणी झालेले आहे त्या ठिकाणी राहत नसल्याने त्यांना व्यक्तीश: नोटीस देणे शक्य झालेले नाही. अशा स्थलांतरीतांच्या नोटीसा राहत्या पत्याच्या जवळच्या सार्वजनिक ठिकाणी चिटकविण्यांत आल्या होत्या.

ज्या अर्थी दोषरहीत व अचूक मतदार यादी तयार करण्यासाठी, जे मतदार त्या यादीभागाच्या पत्यावर सर्व साधारणपणे रहिवास करीत नाही, त्यांची नावे मतदार यादीतून वगळणे आवश्यक् आहे. वरील उल्लेखित स्थलांतरीत मतदारांची यादी मतदार नोंदणी अधिकारी यांच्यामार्फत तयार करण्यांत आली असून ती १४२ - कल्याण (पुर्व) विधानसभा मतदार संघाच्या मध्यवर्ती कार्यालयात वरील दिलेल्या पत्यावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. सदरच्या स्थलांतरीत मतदारांची नावे मतदार यादीतून कमी करण्यांत येणार असून याबाबत कोणाच्याही हरकती व आक्षेप असल्यास त्या दिनांक - ३०/०६/२०२१ रोजी पर्यंत संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयात खालील नमूद केलेल्या पत्त्यावर नोंदविण्यांत यावी. हरकती किंवा आक्षेप उपरोक्त् वेळेत प्राप्त् न झाल्यास सदरची नावे मतदार यादीतून वगळण्यांत येतील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

| विधानसभा मतदार संघाचे नाव | मध्यवर्ती निवडणूक कार्यालयाचे ठिकाण | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १४२ - कल्याण (पुर्व) विधानसभा मतदार संघ | १४२ - कल्याण (पुर्व) विधानसभा मतदार संघ यांचे कार्यालय संत तुकडोजी महाराज "ड" प्रभाग समिती कार्यालय कल्याण (पुर्व), ता. कल्याण. जि. ठाणे. | ०२५१ - २३६०००५ |

मतदार नोंदणी अधिकारी

१४२ - कल्याण (पुर्व) विधानसभा मतदार संघ